## MAHARASHTRA ACT No. XVII OF 1960.

## THE MAHARASHTRA STATE AID TO INDUSTRIES ACT, 1960.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमति दिनांक २४ सप्टेंबर १९६० रोजीं मिळालेली असल्यामुळें तो याद्वारें सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

बी. पी. दलाल,

महाराष्ट्र सरकारचे अपर सचिव.

विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XVII OF 1960.

AN ACT TO REGULATE GRANT OF LOANS TO SMALL SCALE AND COTTAGE INDUSTRIES IN THE STATE OF MAHARASHTRA AND FOR PURPOSES CONNECTED THEREWITH.

## सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.

[राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर महाराष्ट्र राजपत्रांत दिनांक ७ ऑक्टोबर १९६० रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला.]

### महाराष्ट्र राज्यांतील लहान प्रमाणावरील आणि घरगुती उद्योगधंद्यांना द्यावयाच्या कर्ज मंजुरीचें नियमन करण्याबाबत आणि तत्संबंधीं इतर गोष्टींबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यांतील लहान प्रमाणावरील व घरगुती उद्योगधंद्यांना द्यावयाच्या कर्ज मंजुरीचें नियमन करणें इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अकराव्या वर्षी, याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे:—

१. (१) या अधिनियमास महाराष्ट्राचा, उद्योगधंद्यांना राज्याकडून साहाय्य देण्याबाबत अधिनियम, १९६० असें म्हणावें. लघु संज्ञा, व्याप्ति व प्रारंभ.

(२) तो, सबंध महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य सरकार राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून, जी तारीख नेमील त्या तारखेस अंमलांत येईल.

व्याख्या.

२. संदर्भाबरून अन्यथा अर्थ लावणें आवश्यक नसेल तर, ह्या अधिनियमांत,—

(अ) "कर्ज घेणारा" या संज्ञेचा अर्थ, ह्या अधिनियमान्वयें ज्यास कर्ज मिळालें असेल आणि त्याची पूर्णपणें परतफेड करण्यांत आली नाहीं असा इसम असा समजावा ;

(ब) "घरगुती उद्योगधंदा" या संज्ञेचा अर्थ, कारागिराकडून त्याच्या घरांत किंवा घराजवळ चालविण्यांत येत असलेला आणि ज्याचें चालू भांडवल २५,००० रुपयांपेक्षां (किंवा राज्य सरकार अशा नियमांत वेळोंवेळीं निर्देश करील अशा रकमेहून) अधिक नसेल, ही गोष्ट विशेषतः विचारांत घेऊन, राज्य सरकारनें केलेल्या नियमाद्वारें विहित केलेला उद्योगधंदा असा समजावा ;

(क) "उद्योगधंदा" या संज्ञेचा अर्थ, माल किंवा कोणत्याहि हस्तकलेच्या वस्तु तयार करणें, त्याचें रक्षण करणें किंवा त्यावर प्रक्रिया करणें किंवा कोणत्याहि इसमातर्फे चालविण्यांत येत असलेलें औद्योगिक कामकाज किंवा धंदा असा समजावा ;

(ड) "कर्ज" म्हणजे या अधिनियमान्वयें दिलेलें कर्ज ;

(इ) "लहान प्रमाणावरील उद्योगधंदा" या संज्ञेचा अर्थ, उद्योगधंद्याचें स्वरूप आणि त्यांत कामावर नेमलेल्या इसमांची संख्या विचारांत घेऊन, ज्याच्या भांडवली स्वरुपांतील मालमत्तेचें मूल्य (जमीन, इमारत, यंत्रसामग्री, उपकरणें यांत गुंतविलेली मालमत्ता आणि चालू भांडवल धरून) पांच लाखांपेक्षां अधिक नसेल असा कोणताहि उद्योगधंदा, असा समजावा.

ग्रामोद्योग आणि लहान प्रमाणांवरील उद्योगधंदे यांना कर्जे मंजूर करण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

३. सामान्यतः राज्याच्या आर्थिक विकासास प्रोत्साहन देण्याच्या कारणासाठीं, कलम ७ अन्वयें करण्यांत येतील अशा नियमांस अधीन राहून, राज्य सरकार या बाबतींत अधिकार देईल अशा राज्य सरकारच्या अधिकाऱ्यास, लहान प्रमाणावरील आणि घरगुती उद्योगधंद्यांना कर्जे देण्याचा अधिकार आहे.

कर्जासाठीं अर्ज.

४. (१) कोणत्याहि घरगुती किंवा लहान प्रमाणांवरील उद्योगधंद्यांसाठीं कलम ३ अन्वयें कर्ज मिळविण्याची इच्छा असलेल्या कोणत्याहि इसमानें, उक्त कलमान्वयें अधिकार देण्यांत आलेल्या अधिकाऱ्याच्या नांवें, विहित करण्यांत येईल त्या नमुन्यांत आणि त्या तपशिलासहित, अर्ज केला पाहिजे.

(२) पोट-कलम (१) अन्वयें अर्ज मिळाल्यानंतर सदरहू अधिकाऱ्यास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, परंतु कलम ७ अन्वयें केलेल्या कोणत्याहि नियमांस अधीन राहून, ज्या कर्जासाठीं अर्ज करण्यांत आला असेल तें कर्ज मंजूर करण्याचा अधिकार आहे.

कर्जाची परतफेड.

५. प्रत्येक कर्जाची परतफेड ही, कर्ज प्रत्यक्ष ज्या तारखेस देण्यांत आलें असेल त्या तारखेपासून, कलम ७ अन्वयें केलेल्या नियमान्वयें वेळोंवेळीं विहित करण्यांत येईल अशा व्याजाच्या दरानें किंवा दरांनीं, कोणतेंहि असल्यास (दंडादाखलचें व्याज धरून) आणि विहित करण्यांत येईल अशा मुदतींत, हप्त्याहप्त्यानें (वर्षासनाच्या रूपानें किंवा अन्य रूपानें) करण्यांत आली पाहिजे :

परंतु, ह्या कलमांतील कोणत्याहि मजकुरामुळें, कर्ज घेणाऱ्या इसमास कर्जाचे सर्व किंवा कोणतेहि हप्ते ते देणें होतील त्या तारखेपूर्वी कोणत्याहि वेळीं देण्यास प्रतिबंध होणार नाहीं.

६. (१) कलम ७ अन्वयें केलेल्या कोणत्याहि नियमांस अधीन राहून, कलेक्टरनें किंवा राज्य सरकार याबाबत अधिकृत करील अशा अधिकाऱ्यानें, कर्ज मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्याकडून सूचना मिळाल्यावर, सर्व कर्जे, त्यावर आकारतां येईल असें सर्व व्याज (दंडाबाबतच्या कोणतेंहि व्याज धरून) तें देतांना किंवा वसूल करतांना आलेला खर्च, तो जेव्हां देणें होईल तेव्हां, पुढीलपैकीं एक किंवा अधिक रीतीनें वसूल केला पाहिजे :— कर्जाची वसुली.

(अ) कर्ज घेणाराकडून—जणूं तें त्याजकडून येणें असलेली जमीनमहसुलाची थकबाकी आहे असें समजून ;

(ब) त्याच्या जामिनाकडून, कोणताहि असल्यास, जणूं तें त्याजकडून येणें असलेल्या जमीनमहसुलाची थकबाकी आहे असें समजून ;

(क) कर्ज दिलेल्या रकमेंतून जी कोणतीहि मालमत्ता कमाविली असेल त्या मालमत्तेतून, जमीनमहसुलाच्या वसुलीसाठीं असलेल्या कार्यरीतीनुसार, म्हणजे अशा मालमत्तेची विक्री करून ;

(ड) आनुषंगिक तारणांत समाविष्ट असलेल्या मालमत्तेतून, कोणतीहि असल्यास—जमीनमहसुलाच्या वसुलीसाठीं असलेल्या कार्यरीतीनुसार, म्हणजे, अशा मालमत्तेची विक्री करून ;.

(२) असें कोणतेंहि कर्ज, व्याज किंवा खर्च याबाबत देणें असलेली कोणतीहि रक्कम, जामिनानें किंवा कोणत्याहि आनुषंगिक तारणांत समाविष्ट असलेल्या मालमत्तेच्या मालकानें, कलेक्टरास दिली असेल किंवा अशी रक्कम कलेक्टरानें, जामिनाकडून किंवा अशा कोणत्याहि मालमत्तेतून पोट-कलम (१) अन्वयें वसूल केली असेल त्याबाबतींत, कलेक्टरानें, यथास्थिति, जामिनानें किंवा उक्त मालमत्तेच्या मालकानें अर्ज केल्यावर, त्याच्या वतीनें, उक्त रक्कम कर्ज घेणाराकडून किंवा ज्या उद्योगधंद्याच्या फायद्यासाठीं कर्ज मंजूर करण्यांत आलें असेल त्या उद्योगधंद्याच्या मालमत्तेतून, पोट-कलम (१) अन्वयें तरतूद केलेल्या रीतीनें वसूल केली पाहिजे.

७. (१) राज्य सरकारास, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें, ह्या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठीं, नियम करण्याचा अधिकार आहे. नियम करण्याचा अधिकार.

(२) विशेषेंकरून आणि पूर्ववर्ती अधिकाराच्या सामान्यतेस बाध न आणतां, अशा नियमांत पुढील गोष्टींची तरतूद करण्याचा अधिकार आहे :—

(अ) कर्जासाठीं अर्ज करण्याची रीत, अर्जाचा नमुना व पोट-कलम (१) खालील अर्जाच्या नमुन्याचा तपशील आणि अशा अर्जासंबंधीं कलम ४, पोट-कलम (२) अन्वयें चौकशी करण्याची रीत ;

(ब) पैशाचा योग्य उपयोग करण्याबद्दल आणि त्याच्या परतफेडीबद्दल घ्यावयाच्या तारणाचें स्वरूप व मर्यादा, ज्या व्याजाच्या दरानें आणि ज्या शर्तींस अधीन राहून कर्ज मंजूर करण्यांत येईल तो व्याजाचा दर व त्या शर्ती कर्ज मंजूर करण्याची रीत व वेळ ;

(क) ज्या कामासाठीं कर्जें मंजूर करण्यांत आलीं असतील त्या कामांची तपासणी ;

(ड) कलम ५ अन्वयें, ज्या हप्त्यामध्यें आणि ज्या रीतीनें, कर्ज, त्यावर आकारणी करावयाचें व्याज, कोणतेंहि असल्यास (दंडादाखलचें व्याज धरून,) आणि तें देतांना आलेला खर्च दिला पाहिजे ते हप्ते आणि ती रीत ;

(इ) कर्जाच्या खर्चाचा आणि त्या संबंधांत दिलेल्या रकमांचा हिशोब ठेवण्याची आणि त्याची तपासणी करण्याची रीत ;

(फ) तारणांचें मूल्यमापन करणें ;

(ग) कर्ज मिळण्यासाठीं गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा विमा उतरविणें ;

(ह) कर्जाबद्दल तारण म्हणून दिलेल्या मालमत्तेच्या संबंधांतील कबुलायतीचा व गहाणखताचा नमुना ;

(आय्) अधिनियमाच्या अंमलबजावणीसंबंधीं इतर सर्व गोष्टी.

(३) ह्या कलमान्वयें केलेले नियम हे, आगाऊ प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील.

(४) ह्या अधिनियमान्वयें केलेले सर्व नियम, ते करण्यांत आल्यावर शक्य तितक्या लवकर तीस दिवसांहून कमी नाहीं इतके दिवस राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढें ठेवले पाहिजेत व ते अशा रीतीनें ज्या अधिवेशनांत ठेवण्यांत आले असतील त्या अधिवेशनांत किंवा त्या अधिवेशनाच्या लगतपुढील अधिवेशनांत राज्य विधानमंडळ त्यांत जे फेरफार करील त्या फेरफारांस अधीन असतील. आणि ते राजपत्रांत प्रसिद्ध करण्यांत आले पाहिजेत.